लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४+४ (मंथन) = २०, किंमत : ₹ ४.००
सातारा, रविवार, दि. २८ ऑक्टोबर २०१८

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

**सहा प्रकारांमध्ये यश : वक्तृत्व स्पर्धेमध्ये कला, वाणिज्य प्रथम तर पथनाट्य स्पर्धेत छत्रपती शिवाजी कॉलेज प्रथम**

# कोरेगाव युवा महोत्सवात साताऱ्याच्या 'वायसी'चे वर्चस्व

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** शिवाजी विद्यापीठ आणि डी. पी. भोसले कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने कोरेगावात झालेल्या जिल्हास्तरीय ३८ व्या युवा महोत्सवामध्ये साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने सहा स्पर्धा प्रकारांमध्ये यश संपादन केले आहे. सांगली येथे दि. ३१ ऑक्टोबरपासून होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये या महाविद्यालयांना सहभागी होता येणार आहे.

मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये साताऱ्याच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने प्रथम, छत्रपती शिवाजी कॉलेजने द्वितीय तर वाघोलीच्या शंकरराव जगताप आर्टस अँड कॉमर्स कॉलेजने तृतीय क्रमांक पटकावला आहे. वाद-विवाद स्पर्धेमध्ये साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने प्रथम, इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजने द्वितीय तर लोणंदच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. हिंदी वक्तृत्व स्पर्धेत वाघोलीच्या शंकरराव जगताप आर्टस अँड कॉमर्स कॉलेजने प्रथम, फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने द्वितीय तर कऱ्हाडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला.

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने प्रथम, कऱ्हाडच्या महिला महाविद्यालयाने द्वितीय तर कऱ्हाडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला. नकला स्पर्धा प्रकारामध्ये कऱ्हाडच्या वेणुताई चव्हाण कॉलेजने प्रथम, वाईच्या किसन वीर महाविद्यालयाने द्वितीय तर कऱ्हाडच्या यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्सने तृतीय क्रमांक मिळविला. मूकनाट्य स्पर्धेमध्ये साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने प्रथम, कऱ्हाडच्या वेणुताई चव्हाण कॉलेजने द्वितीय तर कऱ्हाडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला.

## लोककलेत वाईच्या 'किसन वीर' प्रथम

लोककला स्पर्धेत वाईच्या किसन वीर महाविद्यालयाने प्रथम, दहिवडी कॉलेजने द्वितीय तर फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. लोकनृत्य प्रकारात साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने प्रथम, रहिमतपूरच्या सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाने द्वितीय तर म्हसवडच्या श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

लघुनाटिका स्पर्धेत साताऱ्याच्या धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्सने प्रथम, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने द्वितीय तर रहिमतपूरच्या सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळवला. एकांकिका स्पर्धेत फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने प्रथम, साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण सायन्सने द्वितीय तर छत्रपती शिवाजी कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला. पथनाट्य स्पर्धेत साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजने प्रथम, रहिमतपूरच्या सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाने द्वितीय तर वाईच्या किसनवीर महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.

भारतीय समूहगीत स्पर्धेत कऱ्हाडच्या सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजने प्रथम, रहिमतपूरच्या सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाने द्वितीय तर साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजने तृतीय क्रमांक मिळविला. सुगम गायनामध्ये कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजने प्रथम, कऱ्हाडच्या वेणुताई चव्हाण कॉलेजने द्वितीय तर फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. लोकसंगीत वाद्यवृंद स्पर्धेत वाईच्या किसन वीर महाविद्यालयाने प्रथम, म्हसवडच्या श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालयाने द्वितीय तर फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला.



कोरेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी केलेल्या नृत्याला उपस्थितांनी भरभरुन दाद दिली.